लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू
औरंगाबाद | रविवार, दि. ५ डिसेंबर २०१० | पृष्ठे : १२+४+४, किंमत - ₹ ३.५०

प्रादेशिक

# अनाथांचा 'नाथ' बनून एच.आय.व्ही. बाधितांची मदत

प्रसाद आर्वीकर

परभणी, दि. ४- जन्मताच एच.आय.व्ही.सारख्या दुर्धर आजाराची सोबत आणि त्यात माता-पित्यांचे हरवलेले छत्र अशा अनाथ बालकांच्या जीवनातही आनंदाची, उत्साहाची लकेर निर्माण करण्याचे काम येथील होमिओपॅथिक अकादमी ऑफ रिसर्च अॅण्ड चॅरिटीज ही संस्था करीत आहे.

या संस्थेचे अध्यक्ष डॉ.पवन चांडक यांच्या पुढाकारातून या अनाथ मुलांच्या पूनर्वसनाचे प्रयत्न सुरू आहेत. परभणीतील जीवनरेखा बालगृहात जवळपास १८ अनाथ मुले एच.आय.व्ही.सह जीवन जगतात. एच.आय.व्ही.सारखा दूर्धर रोग आणि त्यात आलेले अनाथपण यामुळे समाजापासून काहीशा दुरावलेल्या या बालकांच्या जीवनात होमिओपॅथिक अकादमीच्या माध्यमातून पुन्हा एकदा उमेद निर्माण होण्यास निश्चितच मदत होत आहे.

जीवनरेखा बालगृहातील २० मुलांना १८ जुलै २००८ पासून होमिओपॅथिक अकादमीच्या वतीने मोफत उपचार सुरू आहेत. या उपचारांबरोबरच त्यांच्या जीवनात आनंदाचे वातावरण निर्माण व्हावे म्हणून दिवाळी, बाल दिन या ठिकाणी अकादमीच्या वतीने साजरा केला जातो. तसेच विविध स्पर्धांचे आयोजन करून मुलांना प्रोत्साहित केले जाते. या अनाथ मुलांना शक्य तेवढी मदत करण्याचा प्रयत्न ही संस्था करते.

पोषक आहार, स्वच्छतेसाठी आवश्यक ती साधने देण्याचा प्रयत्नही अकादमीने केला आहे. विशेष म्हणजे अकादमीची आर्थिक बाजू कमकमुवत असल्याने या मुलांना मदत व्हावी या उद्देशाने होमिओपॅथिक अकादमी ऑफ रिसर्च अॅण्ड चॅरिटीज संस्थेच्या वतीने 'प्रतिसाद' या चित्रपटाचे आयोजन केले होते. या चित्रपटातून प्राप्त झालेला निधी मुलांसाठी वापरण्यात आला. त्यात कॉटस्, बेडशीट, ब्लॅकेट खरेदी करण्यात आले. मुलांची स्वच्छता आणि त्यांच्या आरोग्याच्या बाबतीतही डॉ.चांडक प्रत्येक आठवड्याला तपासणी करून उपचार करतात.

स्थानिक उपचारांबरोबरच २००८ मध्ये ग्रीस येथील डॉ. जॉर्ज ल्युकस यांच्या संस्थेकडून मिळालेल्या अर्थसहाय्यातून टुबेड एडस् हा उपक्रम राबवून या मुलांच्या सीडी-४ काऊंट, व्हायरल लोड, सी.बी.सी., ई.एस.आर., लिव्हर किडनी फंक्शन या महागड्या चाचण्या करण्यात आल्या होत्या. डॉ. पवन चांडक यांच्या या उपक्रमाचे डॉ.जार्ज ल्युकस संस्थेच्या वतीने प्रशस्तीपत्र देऊन कौतुक झाले आहे.

होमिओपॅथिक अकादमीच्या या उपक्रमामुळे आता इतर काही सामाजिक संस्थांनीही बालकांना मदत केल्याचे डॉ.चांडक यांनी आवर्जून सांगितले. या कामी डॉ.आशा चांडक, डॉ. सचिन मंत्री, विशाल तोष्णीवाल, राहुल पतंगे यांचेही सहकार्य मिळत आहे.